# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
## स्वारगेट, पुणे ४११०३७

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बस रॅपिड ट्रांझिट सेलच्या (बीआरटी कक्ष) कामकाजासाठी करार/कंत्राटी पध्दतीने हंगामी स्वरूपात ११ महिने कालवधीकरीता फिल्ड ऑफिसर ऑपरेशन(मेक अॅटो)-०८, फिल्ड ऑफिसर (प्लॅनिंग)-०१ अशी एकुण ०९ पदे दरमहा एकत्रित मानधनावर भरावयाची आहेत.

वरीलप्रमाणे पदे भरणेबाबतची सविस्तर जाहिरात, अर्हता, आरक्षणाचा तपशिल, अटी शर्ती, आवश्यक कागदपत्रे तसेच त्या अनुषंगाने इतर सर्व आवश्यक माहिती महामंडळाच्या www.pmpml.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी जाहिरात डाऊनलोड करून घ्यावी. व विहित अर्जासह महामंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रासह उपस्थित रहावे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

जाहिरात क्र.०२/२०२१

दिनांक २३/१०/२०२१

## पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
## स्वारगेट,पुणे ४११०३७.

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना नियुक्तीसाठी या जाहिरातीस अनुसरून अर्ज करून कामकाजासाठी करार/कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपाची पदे दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बस रॅपिड ट्रांझिट सेलच्या (बीआरटी कक्ष) कामकाजासाठी करार/कंत्राटी पध्दतीने खाली नमुद केलेली पदे तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सद्य स्थितीत भरावयाच्या पदाचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण तपशिल व अटीशर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | पद संख्या | प्रवर्गानुसार आरक्षण | दरमहा एकत्रित मानधन र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | फिल्ड ऑफिसर ऑपरेशन (मेक/ॲटो) | Degree / Diploma in mechanical /Automobile Engineer. 4 to 5 years experience in any State Transport Undertaking in bus operations / maintenance | ०८ | अनु.जाती -०१<br>अनु. जमाती -०१<br>इमाव -०१<br>विजाभज -१<br>खुला -०४ | २१,०००/- |
| २ | फिल्ड ऑफिसर (प्लनिंग) | Degree/Diploma in Urban Transport Planning MS CIT.Certification. 4 to 5 years experience in any State Transport Undertaking | ०१ | — | २१,०००/- |

अटी व शर्ती -

१. प्रस्तुतच्या नेमणुका हया पुर्णपणे करार /कंत्राटी पध्दतीने असतील. त्यामुळे अर्जदारास महामंडळातील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणूकीचा हक्क सांगता येणार नाही. याबाबत महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

२. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना परिवहन महामंडळाचा कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

३. उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहताना स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट आकाराचे १ रंगीत छायाचित्र, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाकरीता आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका, सर्टिफिकेट, जातीचा दाखला तसेच इतर प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

४. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदासाठी निवड समिती गठीत करण्यात येवून त्यांचे माध्यमातून महामंडळामार्फत शासनाच्या प्रचलित धोरणानूसार उमेदवारांची निवड करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

५. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढविताना एका वेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही मुदतवाढ देताना नियुक्ती केलेल्या पदावरील कामकाजाची गुणवत्ता, प्रमाण इत्यादी अनुषंगिक बाबींचा आढावा घेणे अनिवार्य राहिल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुनःश्च नियुक्त करणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिका-याचे मत असल्यास त्या उमेदवारास पुनःश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल. यापुर्वी महामंडळाकडे करार/कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या उमेदवारांना या जाहिराती व्दारे अर्ज करून कामकाजासाठी निवड प्रक्रियेसाठी सामोरे जावे लागेल.

६. संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी महामंडळाचे वतीने नियुक्तीच्या वेळी संबंधित कंत्राटी /करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांसोबत विहित प्रपत्रात लेखी करार करणे अनिवार्य आहे.

७. कंत्राटी पध्दतीने निर्माण केलेली पदे तात्पुरत्या स्वरूपात, विशिष्ट कालावधीसाठी अस्थायी स्वरूपात निर्माण करण्यात आलेली आहेत.त्यांना कायम स्वरूपी समजण्यात येणार नाही व त्या अनुषंगाने कंत्राटी उमेदवारांनी नियमित सेवेत सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नाही वा त्यांचे सदर कंत्राटी करार पध्दतीने नियुक्त केलेल्या पदावरील नियुक्त्या नियमित करण्यात येणार नाहीत.

८. सदर उमेदवारांना नेमून दिलेल्या ठिकाणी कामकाज करावे लागेल.

९. उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे. सदर नेमणुकीच्या अनुषंगाने गुणानुक्रमे यादी, अंतिम निवड यादी नियुक्ती आदेश महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जातील. ते संबंधीत उमेदवारांनी उपलब्ध करून घेवून मुदतीत महामंडळाचे मुख्य कार्यालयात रूजु व्हावयाचे आहे. याकरिता कोणत्याही उमेदवारास स्वतंत्रपणे पत्रव्यवहार अथवा दुरध्वनी/एमएसएस द्वारे संपर्क करण्यात येणार नाही.याची नोंद घ्यावी.

१०. मुलाखतीसाठी येण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

११. निवड केलेल्या उमेदवारांना महामंडळाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१२. उपरोक्त पदांना कायद्यानुसार आरक्षण लागु राहील.

१३. उपरोक्त पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी दि.०१/११/२०२१ पर्यंत सकाळी १०.०० ते दुपारी ६.०० च्या वेळेत मुख्य प्रशासकीय कार्यालय, पीएमटी बिल्डिंग, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११०३७ येथे अर्ज सादर करावे. मुलाखती बाबत दिनांक व वेळ महामंडळाच्या वेब साईटवर प्रसारित करण्यात येईल. त्या अनुषंगाने उमेदवारांनी मुलाखतीसाठी हजर राहावे. मुलाखतीस येताना मुळ कागदपत्र व त्यांचे साक्षांकित झेरॉक्स प्रतीसह उपस्थित रहावे.

१४. देय मानधनातून प्रचलित कायद्याअंतर्गत वसुल्या केल्या जातील.

१५. कमाल वयोमर्यादा खुल्या उमेदवारासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वय राहील.

१६. मुलाखतीस येण्यापुर्वी उमेदवारांनी बीआरटीएस प्रोजेक्टचा अभ्यास करावा व या मार्गावरील बसने प्रवास करावा असे सुचविण्यात येत आहे.

१७. सदरच्या जाहीरातीनुसार कंत्राटी नेमणूका करण्याचे अथवा कोणत्याही स्तरावर भरती रद्द करण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवलेले आहे, यांची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

१८. प्रस्तुतचे जाहिरातीकरिता करावयाच्या अर्जाचा नमूना जाहिराती सोबत उपलब्ध करून देणेत आलेला आहे. सदरचे अर्जासह उमेदवाराने निश्चित केलेल्या ठिकाणी कागदपत्र पडताळणी साठी उपस्थित रहावे.

१९. सदर जाहिरातीनुसार निवड होणा-या उमेदवारांनी महामंडळाने विहित केलेल्या नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक आहे.

२०. कंत्राटी उमेदवारास परिवहन महामंडळाच्या कोणत्याही विभागामध्ये कामकाज देण्यात येईल.सदरचे कामकाज ३(तीन) शिफ्टमध्ये असेल त्याप्रमाणे शिफ्टमध्येकाम करणे बंधनकारक राहिल.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

अतिरिक्त जावक क्र.पीएमपीएमएल/प्रशासन/ ०१/२०२१
दिनांक : २३/१०/२०२१

# उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
स्वारगेट, पुणे ४११०३७.

विषय :- करार/कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या फिल्ड ऑफिसर ऑपरेशन (मेक/ॲटो) - ०८
ऑफिसर (प्लॅनिंग)-०१ या पदासाठी अर्ज.
संदर्भ :- महामंडळाची जाहिरात क्रमांक ........... दिनांक / /२०२१.

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी महामंडळाच्या बीआरटी कक्ष कामकाजासाठी करार/कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या.................................या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

| | आडनाव | स्वत:चे नाव | वडील/पतीचे नाव |
|---|---|---|---|
| १.संपुर्ण नाव - | ........................ | ........................ | ............................. |

२.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता -..........................................................................................
..........................................................................................................................
..........................................................................................................................
..........................................................................................................................
ई मेल आयडी -.......................................... मोबाईल क्रमांक..................................

३.जन्मतारीख : / /

४. लिंग
पुरुष ☐ स्त्री ☐

५.सद्यस्थितीत महामंडळामध्ये कामकाज करीत आहे काय -होय/नाही.

६.जात : ........................................ प्रवर्ग -...............................

| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | OBC | SBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

८.तांत्रिक व इतर अर्हता तपशिल

१)..............................................................................................................

२)..............................................................................................................

९. अनुभवाचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता -दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन. तसेच माझ्या विरूध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार नाही.

स्थळ : ........................ अर्जदाराची सही : ......................................

दिनांक : / /२०२१ अर्जदाराचे नाव : ......................................

सहपत्रे :- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१)शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे

२) अनुभवाची प्रमाणपत्रे

३) जात व जात वैधता प्रमाणपत्र

४) इतर कागदपत्रे

पुरूष → ☐ स्त्री → ☐